पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – २

**सभावृत्तांत**

दिनांक - **२२/०५/२०१८** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा **मंगळवार** दिनांक **२२/०५/२०१८** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.चौगुले सीमा दत्तात्रय - सभापती**
२. मा.भोईर सुरेश शिवाजी
३. मा.घोलप कमल अनिल
४. मा.गायकवाड निर्मला मनोज
५. मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
६. मा.सुलक्षणा राजू धर
७. मा.निलेश हिरामण बारणे

या शिवाय मा.इंदलकर - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पाठक - उपअभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**खालीप्रमाणे सुचना मांडण्यात आली.**

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.वैशाली घोडेकर

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्यमान नगरसेविका मा.आरती चोंधे यांचे पती कै.सुरेश चोंधे यांचे नुकतेच निधन झालेले असल्याने आजच्या सभेत त्यांना श्रध्दांजली वाहून सभा मंगळवार, दि.१२/०६/२०१८ रोजी दु. २.४५ वा.पर्यंत तहकुब करण्यात यावी.

सदरची सुचना सर्वानुमते मान्य झाली.

-----------

(दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अपर्ण करण्यात आली)

**सभापती -** मंगळवार, दि.१२/०६/२०१८ रोजी दु. २.४५ वा.पर्यंत सभा तहकुब करणेत येत आहे.

**(सीमा दत्तात्रय चौगुले)**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – २

**सभावृत्तांत**

(दिनांक २२/०५/२०१८ ची तहकुब सभा)

दिनांक - **१२/०६/२०१८** वेळ - दुपारी २.**४५** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची दिनांक २२/०५/२०१८ ची तहकुब सभा **मंगळवार** दिनांक **१२/०६/२०१८** रोजी दुपारी २.**४५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.चौगुले सीमा दत्तात्रय - सभापती**
२. मा.भोईर सुरेश शिवाजी
३. मा.घोलप कमल अनिल
४. मा.गायकवाड निर्मला मनोज
५. मा.उषा संजोग वाघेरे-पाटील
६. मा.निलेश हिरामण बारणे

या शिवाय मा.इंदलकर - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पुजारी – कार्य.अभियंता मा.ऐवले – समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

(मा.घोलप नगरसदस्या यांनी शालांत परीक्षेत प्राप्त केलेल्या यशाबाबत मा.सभापती यांचे हस्ते त्यांचा सत्कार करणेत आला.)

-------------

अ) दिनांक १०/०४/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २१) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक १०/०५/२०१८ रोजी झालेल्या विशेष सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०१) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-------------

ठराव क्रमांक - ०४ विषय क्रमांक - ०१
दिनांक - १२/०६/२०१८ विभाग – नगररचना व विकास
सुचक : मा.निलेश बारणे अनुमोदक : मा.कमल घोलप
संदर्भ: मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१८/१७३/२०१७, दि.२५/०९/२०१७

विषय - मौजे किवळे येथील स.नं.३९ ते ७१ येथील मंजूर विकास योजनेतील १८.०० मी. रस्त्याखालील क्षेत्राचे भूसंपादन करणेबाबत.

विषय क्रमांक ०१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ०५ विषय क्रमांक - ०२

दिनांक - १२/०६/२०१८ विभाग – नगररचना व विकास

सुचक : मा.सुरेश भोईर अनुमोदक : मा.निर्मला गायकवाड

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१८/१७४/२०१७, दि.२५/०९/२०१७

विषय : मौजे किवळे येथील स.नं. ७३, ७४, ७५ व ७६ येथील मंजूर विकास योजनेतील १२.०० मी. रस्त्याखालील क्षेत्राचे भूसंपादन करणेबाबत.

विषय क्रमांक ०२ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ०६ विषय क्रमांक - ०३

दिनांक - १२/०६/२०१८ विभाग – नगररचना व विकास

सुचक : मा.सुरेश भोईर अनुमोदक : मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१३/५४/२०१५, दि.११/०५/२०१५

विषय : पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण मंजूर विकास योजनेतील मौजे भोसरी येथील दक्षिणोत्तर १२.० मी. रुंद रस्त्यापासून ते एम.आय.डी.सी. हद्दीपर्यंत स.नं.१५ पै. व १४ पै. मधील २४ व १२ मी. रुंद (पुर्व-पश्चिम) रस्त्याचे क्षेत्र भूसंपादनाबाबत.

विषय क्रमांक ०३ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ०७ विषय क्रमांक - ०४

दिनांक - १२/०६/२०१८ विभाग – नगररचना व विकास

सुचक : मा.सुरेश भोईर अनुमोदक : मा.निलेश बारणे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/०९/६१/२०१८, दि.२७/०४/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे वाकड पिंपळे निलख, थेरगाव या भागातील वाढती लोकसंख्या विचारात घेता व मुळा नदीच्या प्रदुषणाचा विचार करता, सदर भागात मौजे पिंपळे निलख स. नं. ६५ येथे असलेल्या अस्तीत्वातील मैलाशुद्धीकरण प्रकल्पाची क्षमता कमी पडत आहे. त्यामुळे सदर ठिकाणी नवीन प्रकल्प उभारणे आवश्यक आहे. मौजे पिंपळे निलख येथील स.नं. ६४ व ६५ मधील आ. क्र. ३७४ (उद्यान) करीता ४.५० हेक्टर क्षेत्र आरक्षित असून ४.०० हेक्टर क्षेत्र मनपाचे ताब्यात आलेले आहे. सदरच्या ताब्यातील ४.०० हेक्टर क्षेत्रामधील काही क्षेत्रामध्ये सध्या मैलाशुद्धीकरण केंद्र कार्यान्वित आहे. सध्याच्या मैलाशुद्धीकरण केंद्र प्रकल्पाची क्षमता वाढविणेबाबतची जलनि:सारण विभागाची मागणी असून त्याकरीता एकूण २.५० हेक्टर जागा मैलाशुध्दीकरण केंद्रासाठी लागणार आहे. त्यामुळे उद्यानाच्या जागा वापर मध्ये फेरबदल करून मैलाशुद्धीकरण (STP), उद्यान (G) असा फेरबदल करणेकरीता मंजुर विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास तसेच फेरबदलाची विहीत कार्यवाही करून प्रस्ताव शासन मंजूरीस्तव सादर करण्यास मा.महापालिका आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सीमा दत्तात्रय चौगुले)**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३४१/२०१८
दिनांक : १२/०६/२०१८



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.